जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 SEP 2019

Times of India

# SUK invites nominations for Kanbarkar award

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited nominations for the Principal R K Kanbarkar award by September 30.

According to the circular on August 31, the nominations has to be made by a person not below the rank of vice-chancellor and equivalent.

Registrar Vilas Nandavadekar in the circular said , "The award shall be given to a worthy person or a duly registered organization from any part of India for outstanding contributions or achievements in the field of education, literature, social work and cultural activities, sports or other area that may be deemed fit by search and selection committee. The award shall be given without any consideration of religion, region, caste, creed language and gender."

The award is presented on April 13 every year, on the birth anniversary of R K Kanbarkar, with cash of Rs 1.51 lakh, a memento, and a shawl to the selected candidate.

A university official said that the university appoints a five-member search committee for the fair selection of the candidate. The committee is headed by the vice-chancellor.

The award is presented on an annual basis for which the Kanbarkar family had given a cheque of Rs 25 lakh to the university in the year 2015.

Kanbarkar, an octogenarian social activist, was the vice-chancellor of Shivaji University, Kolhapur from 1980 to 1983.The first R K Kanbarkar Award was conferred to the eminent scientist Bharat Ratna C N R Rao April 2016.

He was the frontier leader of several progressive movements in the city. He was also an executive member of several social and educational organizations.

# एमबीएची प्रवेश प्रक्रिया आजपासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

स्थगित करण्यात आलेली एमबीएची प्रवेश प्रक्रिया मंगळवारी, ३ सप्टेंबरपासून सुरू करण्याचे तसेच येत्या दोन आठवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील थांबलेली प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी

## विद्यापीठातील १९८० विद्यार्थ्यांना दिलासा

मार्ग सुकर झाला असून शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारीतील कोल्हापूर, सांगली व सातारा येथील १९८० विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न सुटला आहे. एमबीएच्या प्रथम वर्षासाठी असलेल्या जागा वाटपाबाबत न्यायालयात गेलेल्या मुंबईतील जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधील विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या दाव्यावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी हा निर्णय जाहीर केला.



'एका कॉलेजमधील काही विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेमुळे राज्यातील सर्वच विद्यार्थ्यांच्या करिअरचा प्रश्न निर्माण झाला होता. ऑक्टोबरमध्ये एमबीएचे प्रोजेक्ट सादर करायचे असतात. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत वर्ग सुरू झाल्यानंतर प्रोजेक्टची तयारीही करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याला दिलासा देणारा हा निकाल आहे.

– कल्याणी विभुते, विद्यार्थिनी

एमबीएच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीतील जागा वाटपातील व्यस्त प्रमाणामुळे मुंबईतील जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधील प्रवेश रद्द होणारे विद्यार्थी न्यायालयात गेल्यामुळे राज्यातील सर्व एमबीएची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. याचा परिणाम शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या २४ कॉलेजमधील एमबीए विभागातील प्रवेश प्रक्रियेवर झाला होता. एमबीएसाठी प्रवेश घेऊन पहिली जागा वाटप फेरी झाल्यानंतर प्रक्रिया स्थगित केल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची समस्या निर्माण झाली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने तक्रारदार विद्यार्थ्यांच्या याचिकेतील कोटा पद्धतीबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यांना फेटाळून प्रवेश प्रक्रिया थांबवू नये, असे स्पष्ट केले आहे.

१४ ऑगस्ट रोजी पहिल्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चिती करावी असे जाहीर करण्यात आले होते. मात्र जमनालाल बजाज इन्स्टिट्यूटने या प्रक्रियेविरोधात याचिका दाखल केल्यामुळे प्रक्रिया ठप्प झाली होती. परिणामी शिवाजी विद्यापीठातील एमबीएच्या पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया थांबवण्यात आली होती. याबाबत सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी झाली.

### दोन आठवड्यांत वर्ग सुरू

न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार दोन आठवड्यात सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे स्पष्ट केले आहे. यानुसार १७ सप्टेंबरपर्यंत अंतिम फेरी पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र पहिल्या दोन अलॉटमेंटनंतर तातडीने वर्ग सुरू करावेत, असे न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच अलॉटमेंट फेरीनुसार प्रवेश निश्चिती सुरू असतानाच येत्या दहा दिवसांत वर्ग सुरू होण्याचीही शक्यता आहे.

# विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेचे कुडित्रे येथे बुधवारपासून आयोजन

**कळे (वार्ताहर) :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन युवराज पाटील कुस्ती संकुल कुडित्रे (ता.करवीर) येथे दि.४ पासून करण्यात आले असून स्पर्धेचे संयोजन कळे येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाकडे आहे. स्पर्धेमध्ये कोल्हापूर विभागातील जवळपास ४० महाविद्यालयातील सुमारे दोनशे कुस्ती पट्टू ग्रीको रोमन व फ्री स्टाईल या क्रीडा प्रकारात भाग घेतील, असे स्पर्धा संयोजक प्रा. विक्रम यमगेकर यांनी सांगितले. कोल्हापूर : प्रतिनिधी

पुढारी

# एम.फिल; पीएच.डी.ची १८ पासून प्रवेश परीक्षा

## 'ओएमआर' शिटवर ऑफलाईन पद्धतीचा अवलंब

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एम.फिल., पीएच.डी. प्रवेशासाठीची परीक्षा शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन परीक्षा केंद्रांवर दि. १८, १९, २० सप्टेंबर रोजी ऑफलाईन पद्धतीने 'ओएमआर' शिटवर परीक्षा घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या वतीने एम.फिल., पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता दि. १५ ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने अर्ज प्रक्रियेस प्रारंभ झाला. ३१ ऑगस्ट रोजी ऑनलाईन अर्जाची मुदत संपली आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली या केंद्रावर प्रवेश परीक्षा होईल. प्रवेश परीक्षा शंभर गुणांची असणार आहे. यात प्रत्येकी दोन गुणांचे ५० बहुपर्यायी प्रश्न असतील. मंगळवार (दि. २) सप्टेंबरपासून अर्जाची छाननी सुरू होऊन अंतिम यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर परीक्षेचे वेळापत्रक विषयानुसार जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# डॉ. रूपा शहा यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**कोल्हापूर : प्रा. डॉ. रूपा शहा यांच्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर.**

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमाप्रमाणे प्रा. डॉ. रूपा शहा, सोलापूर येथील प्रा. डॉ. बी. एच. दामजी यांनी लिहिलेल्या बी. ए. भाग-२ (सेमिस्टर ३ व ४) च्या 'सहकार' विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. फडके प्रकाशनसाठी डॉ. शहा यांनी लिहिलेले हे २५ वे पुस्तक आहे. विद्यापीठातील कुलगुरूंच्या दालनात कार्यक्रम झाला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. गिरीष कुलकर्णी, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. एस. देशमुख, वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. प्रवीण बाबर, कुलगुरूंचे स्वीय सहायक विलास सावंत, मिलिंद कोळी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अभ्यासक्रमात होणाऱ्या बदलानुसार फडके प्रकाशनने सातत्याने विद्यार्थ्यांना विविध विषयांची पुस्तके दिली आहेत. महावीर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाल्यावरही डॉ. शहा यांनी हात लिहिता ठेवला आहे.'' डॉ. शहा यांनी स्वागत केले. फडके प्रकाशनने सातत्याने प्रकाशित केली, म्हणून एका विषयावरील २५ पुस्तके आपल्या हातून लिहिली गेली, असे त्यांनी सांगितले. प्रकाशक मंदार फडके यांनी आभार मानले.